
MAHARASHTRA TOURISM

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन



# महाराष्ट्र: आदिवासी संस्कृतीची लय आणि लोकसंगीताचे पडघम

# महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे




# महाराष्ट्राचा सजीव सांस्कृतिक वारसा

महाराष्ट्र राज्य हे सांस्कृतिक विविधतेचे समृद्ध वैभव आहे, जिथे निसर्ग आणि संस्कृती यांचा सुंदर संगम पाहायला मिळतो.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने (MTDC) पालघर आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये, अमूर्त सांस्कृतिक वारशावर ( ICH )आधारित अनुभवात्मक पर्यटन विकसित करत आहे. स्थानिक समुदायांच्या सहकार्याने, पर्यटकांना या अनोख्या ठिकाणांचा अनुभव घेण्याचे आयोजन केले जाते.

जिथे संस्कृती ही सजीव आणि सतत बदलणारी आहे, याची अनुभुती मिळते. वारली चित्रकला, तारपाच्या मोहक वाद्याची लय, बोहाडा मुखवट्यांची रंगतदार कथा, तसेच पारंपरिक वाद्यांसह सादर होणारी लोकगीते व नृत्याचा अनुभव पर्यटकांना भूमी, लोक आणि परंपरा यांच्याशी एकमेकांना जोडतात.

येथे संस्कृती ही केवळ एक प्रदर्शन वस्तु नाही तर ती शेती, सण, विधी आणि दैनंदिन जीवनाशी जोडणारा एक अनोखा अनुबंध आहे. पर्यटकांना या समुदाय-आधारित उपक्रमांमध्ये सहभागी होऊन, निसर्ग आणि ऋतुचक्राशी जोडलेल्या परंपरांचा अनुभव घेण्याचे, तसेच नैसर्गिक पारंपरिक साधनांमधून साकारलेल्या संगीताचा आस्वाद घेण्याचे आमंत्रण दिले जाते.





# लोकजीवनाची स्पंदने

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात लोकगीते आणि लोकनृत्य ही केवळ मनोरंजनाची साधने नसून, ती इथल्या दैनंदिन जीवनाशी आणि श्रद्धांशी घट्ट विणलेली आहेत. स्थलांतर, प्रेम, कष्ट आणि भक्तीच्या कथांमधून उगम पावणारी ही कला, समुदायांच्या एकत्र येण्यातून साकारते. पेरणीपासून सुगीपर्यंतच्या निसर्गचक्राला आणि जीवनातील महत्त्वाच्या टप्प्यांना या नृत्यांची साथ असते; तर भोपळा, बांबू आणि मातीपासून बनवलेल्या वाद्यांतून संगीताचे सूर उमटतात.

ही परंपरा अनुभवणे म्हणजे एका अशा जिवंत लयीत प्रवेश करणे, जिथे समाज, निसर्ग आणि संस्कृती एकरूप होऊन जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून स्वतःला व्यक्त करतात.

# पालघर

## सागर आणि वनराईची लय

पालघरच्या परंपरा येथील अथांग वनराई, सुपीक शेती आणि समृद्ध सागरी जीवनातून आकाराला आल्या आहेत. येथील नृत्य आणि संगीतातून सुगीचा आनंद, ईश्वरभक्ती आणि सामाजिक एकतेचा दर्शन घडते. हा केवळ कलाविष्कार नसून, निसर्ग आणि मानवाच्या अतूट नात्याचा उत्सव आहे.

### पालघरमध्ये अनुभवण्याजोगे उपक्रम



**तारपा नृत्य**

तारपा वाद्याच्या तालावर धरला जाणारा हा एक वर्तुळाकार फेर आहे. सुगी आणि दिवाळीत सादर होणारे हे नृत्य निसर्ग, एकता आणि जीवनातील लयीचा उत्सव साजरा करते.



**गवरी नृत्य**

गवरी देवीला समर्पित असलेले हे आनंददायी सुगीचे नृत्य आहे. ढोलाचा गजर आणि घुंगरांच्या तालावर हे नृत्य संपूर्ण पालघरमध्ये रंगते.



**कांबडी नृत्य**

पाऊस आणि भरभराटीसाठी निसर्गाला साकडे घालणारे हे एक पवित्र विधी-नृत्य आहे. डहाणूतील निकणे, आसवली, धानिवरी, हळदपाडा आणि जव्हारमधील शिरोशी गावात या चैतन्यमयी परंपरेचा अनुभव घेता येतो.



**घोर नृत्य**
दिवाळीपूर्वी गावोगावी फिरून सादर केले जाणारे 'घोर' हे एक पारंपारिक विधी-नृत्य आहे. आनंदोत्सव आणि भक्तीचा अर्घ्य अर्पण करणारी ही अनोखी परंपरा अनुभवण्यासाठी धरमपूर गावाला नक्की भेट द्या.



**नंदी नृत्य**
शिवाचे दिव्य वाहन असलेल्या 'नंदी'च्या रूपाला समर्पित हे नृत्य, जव्हारमधील नांगडमोटा गावात उत्साहाने सादर केले जाते. शिव आणि पार्वतीच्या पावन मिलनाची कथा सांगणारा हा सोहळा इथल्या श्रद्धेचे आणि संस्कृतीचे दर्शन घडवतो.



**होडी नृत्य**
नयनरम्य मुखवटे आणि प्रतिकात्मक नृत्यांच्या माध्यमातून पौराणिक कथा, प्रवास आणि देवतांना जिवंत करणारे हे एक वैशिष्ट्यपूर्ण नृत्य आहे. बापुगावजवळील सैवानच्या परिसरात होडी परंपरा जपली जाते.



**ढोल नृत्य**
ढोलाच्या दमदार आणि वेगवान तालावर आधारलेले हे एक चैतन्यमयी नृत्य आहे. सण-उत्सवांच्या वेळी सादर होणारा हा कलाविष्कार सामूहिक आनंद आणि सांस्कृतिक अभिमानाची एक प्रभावी अभिव्यक्ती आहे.

# विशेष अनुभव: तारपा नृत्याचा फेर

तारप्याच्या तालावर फिरणाऱ्या नर्तकांच्या वर्तुळात स्वतःला झोकून द्या.
वाळलेला भोपळा, बांबू आणि मधाच्या मेणापासून बनवलेले हे पारंपारिक वाद्य या नृत्याची लय ठरवते, तर 'घोर काठी' धारण केलेला नर्तक या फेराचे नेतृत्व करतो. हाच वर्तुळाकार आकृतीबंध वारली चित्रांतही दिसतो; जो कला, निसर्ग आणि समाज यांच्यातील अतूट नात्याचे दर्शन घडवतो.







# पालघरचे लोक इतिहास संग्रहालय

पालघरच्या या समृद्ध सांस्कृतिक भूमीचा अनुभव घेताना, तुमच्या प्रवासाची सुरुवात आवर्जून 'पालघर लोक इतिहास संग्रहालयापासून करा. जिल्ह्याच्या गौरवशाली वारशाची सखोल ओळख करून देणारे हे एक आगळेवेगळे 'सजीव संग्रहालय' (Living Museum) आहे. 1880 च्या दशकातील एका ऐतिहासिक शालेय इमारतीत वसलेले हे संग्रहालय, विचारपूर्वक मांडलेल्या प्रदर्शनांच्या माध्यमातून पालघरच्या विविध सांस्कृतिक पैलूंना एकत्र आणते.

येथे येणाऱ्या पर्यटकांना वारली चित्रकला, बोहाडा नृत्यातील वैशिष्ट्यपूर्ण मुखवटे, बांबूपासून बनवलेली सुबक हस्तकला आणि पारंपारिक तारपा वाद्ये जवळून पाहता येतात. तसेच, लोकसंगीत आणि सादरीकरणाच्या विविध लोककलांचा वारसा येथे जतन केला आहे. संग्रहालयात स्थानिक पारसी संस्कृती, नामवंत कलाकार आणि ग्रामीण जीवनातील दैनंदिन वस्तूंचे स्वतंत्र विभाग असून, यातील अनेक वस्तू स्थानिक नागरिकांनी अत्यंत आपुलकीने संग्रहालयाला भेट दिल्या आहेत.

केवळ वस्तूंचा संग्रह नव्हे, तर हे संग्रहालय म्हणजे इथल्या मातीचा सुगंध आणि माणसांच्या जिवंत कथांचा एक अमूल्य ठेवा आहे. डहाणूपासून उत्तरेस सुमारे 15 किमी अंतरावर असलेले हे ठीकाण रेल्वेने-रस्ते मार्गाने जोडलेले असल्याने पर्यटकांसाठी अत्यंत सोयीचे आहे.

# नाशिक

## डोंगररांगा मधले प्रतिध्वनी

नाशिकमधील परंपरा येथील पावसाळी निसर्गचक्र, शेती आणि आध्यात्मिक जीवनाशी अतूटपणे जोडलेले आहे.

### *नाशिकमध्ये अनुभवण्याजोगे उपक्रम*



**ठाकर नृत्य**
पावसाळ्याच्या आगमनावेळी आणि पेरणीच्या प्रारंभाचे प्रतीक म्हणून 'ठाकर' नृत्य सादर केले जाते. पारंपारिक ढोलांच्या तालावर आणि चैतन्यमयी फेरात रंगणारे हे नृत्य शेती संस्कृतीशी असलेले अतूट नाते दर्शवते.



**डोंगरी देव नृत्य**
डोंगराच्या देवतेला समर्पित हे एक पवित्र विधी-नृत्य आहे. ढोलांच्या तीव्र गजरातून आणि जोमदार हालचालींतून डोंगराचा रक्षक असलेल्या देवतेप्रती गाढ भक्ती व्यक्त केली जाते.



**डांगी नृत्य**
गडद लाल आणि पिवळ्या रंगाच्या आकर्षक पोशाखांसाठी ओळखले जाणारे हे एक चैतन्यमय नृत्य आहे. यातील वेगवान पदनृत्य आणि ऊर्जावान रचना प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून टाकतात.



**पावरी नृत्य**
'पावरी' या वाद्याच्या मधुर सुरावटीवर आधारित हे एक मोहक नृत्य आहे. पावरीचे मंत्रमुग्ध करणारे सूर विधी आणि उत्सवांदरम्यान नर्तकांना साद घालतात. संपूर्ण जिल्ह्यात हे नृत्य मोठ्या उत्साहाने सादर केले जाते



**मादल नृत्य**
जोडीने आणि अत्यंत लयबद्ध पद्धतीने सादर केले जाणारे 'मादल' हे एक वैशिष्ट्यपूर्ण नृत्य आहे. पांढरे शुभ्र पोशाख, कंबरेला रंगीत सजावट आणि पाठीवर घुंगरू बांधलेले नर्तक या नृत्याचे मुख्य आकर्षण असतात.



**वाघ पावरी नृत्य**
झाडांच्या फांद्या, काड्या आणि नैसर्गिक तंतूंपासून तयार केलेले वैशिष्ट्यपूर्ण पोशाख परिधान करून नर्तक येथे 'वाघा'चे रूप साक्षात उभे करतात. हे नृत्य जंगल, वन्यजीव आणि आदिवासी समुदाय यांच्यातील अतूट नात्याचा एक गौरवशाली उत्सव आहे.

# विशेष अनुभव: बोहाडा मुखवटा उत्सव

पौराणिक कथा, लयबद्ध नृत्याच्या हालचाली आणि रात्रभर चालणाऱ्या सादरीकरणाच्या एका अद्भुत जगात प्रवेश करा. देवदेवता, आत्मे आणि प्राण्यांचे भव्य मुखवटे परिधान केलेले नर्तक गावातील मोकळ्या जागांचे रूपांतर विधी आणि कथा सांगणाऱ्या एका चैतन्यमय रंगमंचात करतात.

दरवर्षी मार्च ते मे महिन्यांच्या दरम्यान आयोजित केला जाणारा हा उत्सव म्हणजे डोळ्यांचे पारणे फेडणारा सोहळा असतो.

या उत्सवाचा अविभाज्य भाग असलेले बोहाडा मुखवटे तयार करणाऱ्या कारागिरांना भेटण्यासाठी सुरगाणा तालुक्यातील पिंपळसोंड गावाला नक्की भेट द्या.



# भूमीची लोकवाद्ये

येथील संगीत निसर्गातून साकारले आहे.
• सुषिर वाद्य: तारपा, पावरी
• तालवाद्य: ढोल, ढाक, मंजिरा
• तंतुवाद्य: घांगळी
कारागिरांना ही वाद्ये घडवताना पहा आणि त्यांचा मंत्रमुग्ध करणारा आवाज अनुभवा.









## तारपा वाद्य परंपरेचे महर्षी

लोककलेच्या विश्वात पालघर जिल्ह्याचे नाव सुवर्णअक्षरांनी कोरणारे व्यक्तिमत्व म्हणजे पद्मश्री भिकल्या लाडक्या धिंडा. तारपा वाद्य वाजवण्यातील कौशल्य आणि ते घडवण्यातील कसब या दोन्ही आघाड्यांवर त्यांनी दिलेले योगदान अद्वितीय आहे. तारपा वाद्याची लय त्यांनी जगभर पोहोचवली आहे.

# लोकगीतांचे सुर आणि लोकवाद्यांची लय

गावागावांमधून गुंजणारी ही लोकगीते इथल्या समुदायाची सामूहिक स्मृती सजीव ठेवतात.



**डेरा गीत**
डेरा-मोरपिसांतून साकारणारी भक्तीमय लोकगीते.



**थाळी वाद्य**
थाळीच्या तालावरील लयबद्ध कला.



**ढाक वाद्य**
संस्कृती, श्रद्धा व लोककलेचा अनोखा संगम.



**टिपरी गीत**
देवांना समर्पित पारंपरिक भक्तीगीते.






# संस्कृतीचा अक्षय प्रवाह

येथील लोकनृत्य आणि संगीत परंपरा आजही एक सजीव सांस्कृतिक वारसा म्हणून जोमाने टिकून आहेत. 'मातीच्या रंगाचे संमेलन' आणि नाशिक अमूर्त कला (ICH) महोत्सव' यांसारख्या उत्सवांतून हे वैभव प्रकर्षाने दिसून येते, जिथे सायंकाळच्या सत्रात संपूर्ण प्रदेशातील स्थानिक कलाकार एकत्र येऊन आपली कला सादर करतात. तारपा, पावरी, घोर, मादल, गवरी, कांबडी, वाघ पावरी आणि संबळ यांसारखी नृत्ये शेतीशी निगडीत जीवन, ऋतूचक्र आणि सामूहिक आनंदाचे प्रतिबिंब आहेत.

असे सांस्कृतिक मेळावे या प्रदेशाच्या कलात्मक वारशाचे सातत्य अधोरेखित करतात. अनुभवी कलाकारांसोबत तरुण पिढी यात सहभागी होते आणि त्यांच्याकडून प्रत्यक्ष धडे गिरवते. यामुळेच या चैतन्यमयी परंपरा भविष्यासाठी जतन केल्या जात असून नव्या रूपात त्या पुन्हा जिवंत होत आहेत.

आगामी आयसीएच उत्सव:
सुरगाणा, नाशिक — 2 ते 4 ऑक्टोबर 2026
जव्हार, पालघर — 3 ते 4 ऑक्टोबर 2026



# प्रवास व संपर्क

## कलाकारांशी संपर्क

**पालघर**
- भिकल्या लाडक्या धिंडा – 876733352
- गणपत भुजड – 9637341935
- विठ्ठल कोरडा – 9284604662
- शांतराम बेलकर – 9209876219
- शंकर बोरशा – 7020771225
- राजेंद्र महाले – 8010394175
- जगनाथ अर्जुन खापडे – 9021455753
- सीता गणपत गवित – 7066110049

**नाशिक**
- लक्ष्मण बंगाल – 9651526023
- भाऊराव बंगाल – 9370011716
- गणपत गवित – 9405783465
- गुलाब म्हसे – 7821810500
- मुकुंद पडवी – 9689039040
- श्रावण के. गवित – 8080512123

## आपली भेट नियोजित करा

**भेट देण्याचा सर्वोत्तम काळ**
पावसाळा, कापणीचा हंगाम आणि वसंत ऋतूतील सण

**अनुभवासाठी सुचवलेले उपक्रम**
- तारपा नृत्य वर्तुळात सहभागी व्हा
- बोहाडा महोत्सवाला उपस्थित राहा
- पारंपरिक गीतांच्या मैफलींचा आस्वाद घ्या
- स्थानिक समुदाय संग्रहालयाला भेट द्या
- कलाकार आणि संगीतकारांशी संवाद साधा

**कालावधी**
1–2 दिवस

**मार्ग**
पालघर: डहाणू मुंबईपासून सुमारे 120–140 किमी (रस्ता/रेल्वेने).
जव्हार डहाणूपासून सुमारे 80 किमी (रस्त्याने).
नाशिक: मुंबईपासून सुमारे 165–180 किमी (रस्ता व रेल्वेने सुलभ).
सुरगाणा नाशिक रोडपासून 95 किमी आणि वलसाडपासून 90 किमी अंतरावर आहे.

पालघर आणि नाशिकच्या निसर्गसौंदर्याचा आनंद लुटा. येथील मोहक फार्महाऊस आणि होमस्टेमध्ये मुक्काम करून ग्रामीण जीवनातील संथ लय आणि शांततेचा अनुभव घ्या.



## जिथे संस्कृती जिवंत आहे असा महाराष्ट्र अनुभवा

क्युरेटर्स आणि सांस्कृतिक संस्थांसाठी

- पारंपरिक कलावृंदांना आमंत्रित करा.
- समुदाय-नेतृत्वाखालील सादरीकरणांना प्रोत्साहन द्या.
- कार्यशाळा आणि निवासी कार्यक्रमांचे आयोजन करा.

अधिक माहितीसाठी
QR कोड स्कॅन करा

MAHARASHTRA TOURISM

/Explore Maharashtra - MTDC
www.heritagevillagesmtdc.com
/exploremaharashtra.mtdc
ich@maharashtratourism.gov.in